मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या दिनांक २४ मार्च १९९४ रोजी संपन्न झालेल्या १६ व्या बैठकीचा स्थायी करण्यात आलेला कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

गुरुवार दि. २४/३/९४ रोजी झालेल्या मंडळाच्या १७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १७ वी बैठक गुरुवार दि. २४ मार्च १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन सभागृह येथे संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१] डॉ. शंकर वा. मटकर	....	सभापती
२] श्री. हेमराज शहा	....	उपसभापती
३] श्री. अशोक लाल	....	मुख्य अधिकारी
४] श्री. पोतदार प्रमुख अभियंता, मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी		सदस्य
५] श्री. व्ही. बी. वरसकर		सदस्य
६] श्री. कमलाकर शर्मा		"
७] श्री. शंकरराव पिटला		"
८] श्री. फारुख मन्सुरी		"
९] श्री. विवेक भर्तू		"
१०] श्री. महंमद आजम खान		"
११] श्री. श्रीकांत पाटील		"
१२] श्री. गजेंद्र लष्करी		"
१३] श्री. रॉकी क्रास्टो		"
१४] श्री. आर. जी. भंडारी, उपकरसंचालक व संकलक मुंबई महानगरपालिका		निमंत्रित

श्री. यादवराव कांबळे, उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांनी विधानसभेच्या कामामुळे बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याविषयी कळविले होते अशी माहिती मंडळाच्या सचिवांनी दिली.

मा. सभापती डॉ. शंकर वा. मटकर यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. मा. सभापती, उपसभापती, सदस्य, निमंत्रित व अधिकारी यांचे स्वागत करण्यांत आले.

.....२/-

बाब क्र. १७.१

विषय- मंडळाच्या १७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे -

....

दिनांक २४/२/९४ रोजी झालेल्या १७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत पृष्ठ क्र. १ ते १५ वर सादर केला आहे. मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी सूचना केली की पृष्ठ क्र. ५ वर बाब क्र. १६/३ च्या चर्चेच्या वेळी "पुनर्विकासाद्वारे उपलब्ध होणारे गाळे शासनाच्या मंजुरीनुसार वितरीत केले आहेत" असा उल्लेख आवश्यक आहे. सविस्तर चर्चेअंती ही सूचना मान्य करण्यांत आली.

वरील सुधारणेसह मंडळाच्या १७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यांत आला.

बाब क्र. १७/२

विषय : अनुपालन अहवाल.

मा. उपसभापती श्री. हेमराज शहा यांनी प्रश्न विचारला की पुनर्रचित इमारतीमधील रिक्त गाळ्यांची यादी सदस्यांना अद्यापपर्यंत सादर कर करण्यांत आली नाही. सहमुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की सदर यादी तयार असून त्याच्या प्रती काढण्याचे काम बाकी आहे. लवकरच ही यादी सदस्यांना वितरीत करण्यात येईल.

बाब क्र. १७.३

विषय- इमारत क्र. ५२-५८-५८ ए. बी. सी. व ६०-६४-६६ रघुनाथ महाराज मार्ग आणि ३६ लोकमान्य टिळक मार्ग "बी" विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या निविदा मंजूर करण्याबाबत.

....

वरील विषयाची बाब टिपणी पृष्ठ क्र. १९ ते २५ वर सादर केली आहे. उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी या संदर्भात सविस्तर माहिती सभागृहात सादर केली. दि. २४/२/९४ रोजी झालेल्या निविदा समितीच्या बैठकीत मे. हिरु कन्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटीनंतर निश्चित केलेली रु. ५५,६०,८९६.०० [रुपये पंचावन्न लक्ष साठ हजार आठशे शहाण्णव फक्त] एवढ्या रक्कमेची व निविदा रक्कमेच्या १४.५५ टक्के अधिक असलेली निविदा स्विकृत करण्याविषयीची शिफारस निविदा समितीने केलेली होती. निविदेचा ग्राह्य कालावधी दि. ६/३/९४ पर्यंत

पर्यंत असल्यामुळे मुख्य अधिकारी यांनी मा. सभापती, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या मान्यतेनुसार व निविदा समितीच्या शिफारशीनुसार मे. हिरु कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकृत करून पुढील कार्यवाही केलेली आहे. मुख्य अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी द्यावी, अशी सभागृहास विनंती करण्यात आली. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्र. १७/१३०

इमारत क्र. ५२-५८-५८ ए. बी. सी. व ६०-६४-६६ रघुनाथ महाराज मार्ग आणि ३६ लोकमान्य टिळक मार्ग, बी विभाग या इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेच्या कामासाठी मे. हिरु कन्स्ट्रक्शन यांच्या रु. ५५, ६०, ८९६/- [रुपये पंचावन्न लक्ष साठ हजार आठशे शहाण्णव फक्त] एवढया रक्कमेची निम्नतम निविदा स्विकारण्याची शिफारस निविदा समितीने केलेली होती. या शिफारशीनुसार ही निविदा स्विकृत करून मुख्य अधिकारी यांनी पुढील कार्यवाही केलेली आहे. मुख्य अधिकारी यांनी घेतलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्र. १७. ४

विषय- इमारत क्र. १५/४ उरणकर वाडी तात्या घारपुरे पथ "डी" विभाग गिरगांव येथील भूखंड इमारतींसह नियोजित सिध्दी सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादीत करण्याचा प्रस्ताव.

....

म्हाडा अधिनियम कलम १०३ ब अन्वये वरीलप्रमाणे भूसंपादनाचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ४१ ते ६५ वर सादर केलेला आहे. मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी प्रश्न विचारला की अनेक संस्थांचे भूसंपादनाचे प्रस्ताव प्रलंबीत असताना हा एकच प्रस्ताव मंडळापुढे मंजुरीसाठी का ठेवण्यांत आलेला आहे ? मुख्य अधिकारी यांनी यासंदर्भात खुलासा केला की रहिवाशांच्या सहकारी संस्थांकडून प्राप्त झालेले भूसंपादनाचे प्रस्ताव म्हाडा अधिनियमातील

....४

तरतुदींची तसेच न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वाची पूर्तता करीत आहेत काय याची पूर्ण छाननी करून कोणत्याही त्रुटी नसलेले परिपूर्ण असे भू-संपादनाचे प्रस्ताव मंडळापुढे मंजूरीसाठी सादर केले जातात. यासंदर्भात आतापर्यंत प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या संदर्भात आढावा घेण्यांत आला. ८

आतापर्यंत प्राप्त झालेले प्रस्ताव	-	२६७
नामंजूर केलेले प्रस्ताव	-	८७
कार्यवाही करण्यायोग्य प्रस्ताव	-	१८०
शासनाकडे सादर केलेले प्रस्ताव	-	१३४
शासनाने मंजूरी दिलेले प्रस्ताव	-	१०३
मंडळाकडे असलेले प्रस्ताव	-	४६
अपूर्ण माहिती असलेले प्रस्ताव	-	४५

या खुलाशामुळे सर्व सदस्यांचे समाधान झाले व सादर केलेला भूसंपादनाचा प्रस्ताव मंजूर करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी सूचना केली की या प्रस्तावांच्या संदर्भात घरमालकास पाठविण्याचे पत्र रजिस्टर्ड पत्राने पाठवावे. ही सूचना मान्य करण्यांत आली.

ठराव क्र. १७/१३१

इमारत क्र. १५/४ उरणकर वाडी मात्या घारपुरे पथ "डी" विभाग मुंबई- ४ येथील भूखंड त्यावरील इमारतींसह नियोजित सिध्दी सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादन करण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यांत आला.

बाब क्र. १७/५

विषय- मे. मातुल्य मिल्स लिमिटेड यांचेकडून प्राप्त होणा-या भूखंडावर पुनर्रचना योजना राबवून त्यामध्ये संक्रमण शिबीरांत अनेक वर्षे रहात असलेल्या रहिवाश्यांना पुनर्वसित करण्याविषयी.

....

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र. ६७ ते ७१ वर सादर केलेला आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी सभागृहास सविस्तर माहिती सादर केली.

दिनांक २८/७/९३ रोजी मुंबई गृहनिर्माण मंडळाने मे. मातुल्य मिल्स यांच्या मालकीच्या मोअर परळ विभागातील भूकर पत्री क्र. २४९ वरील ४६१६.४८ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड विकास योजना कलम ५८ अन्वये विनामोबदला प्राप्त करुन घेतलेला आहे.

या भूखंडावर विकास नियंत्रण नियमाच्या कलम ३३[९] अंतर्गत नागरी नूतनीकरण योजनेखाली पुनर्विकास योजना राबविण्याचे विचाराधीन आहे. या योजनेसाठी ३.१९२ चटईक्षेत्र निर्देशांक प्राप्त व्हावा यासाठी मुंबई महानगरपालिकेत विनंती केली आहे व प्राधिकरणाच्या वरीष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्यांत येत आहे. या योजनेनुसार १८० चौ.फूट चटई क्षेत्रफळाचे सुमारे ७०० स्वयंपूर्ण गाळे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. हे गाळे उपलब्ध झाल्यास संक्रमणशिबीरांत अनेक वर्षे रहाणाऱ्या व ज्यांच्या इमारतींची पुनर्बांधणी शक्य नाही अशा रहिवाश्यांना मालकी तत्वावर गाळे वितरीत करणे प्रस्तावित आहे. "हुडको" या वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन ही योजना कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेनुसार उपलब्ध होणारे गाळयांची किंमत ठरविताना कर्जाची व्याजासह परतफेड, आस्थापना खर्च, आस्थापना व किरकोळ नफा इत्यादी बाबींचा समावेश करणे प्रस्तावित आहे. गाळयांची किंमत एकरकमी पध्दतीने वसूल करुन त्यांचे वितरण करणे प्रस्तावित आहे. अपवादात्मक परिस्थितीत किंमत विहित मुदतीत मासिक हप्त्याने वसूल करण्याचा निर्णय घेण्यात येईल. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. संक्रमण शिबीरांतील रहिवाशांची आर्थिक स्थिती विचारांत घेता या योजनेस संक्रमण शिबीरांतील रहिवाश्यांचा कितपत प्रतिसाद मिळेल या विषयी मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला व अन्य सदस्यांनी शंका उपस्थित केली. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की अनेक रहिवासी १५ वर्षाहून अधिक काळ संक्रमण शिबीरांत रहात असून सध्याचा पुनर्बांधणी कार्यक्रमाचा वेग व उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त गाळयांची संख्या लक्षांत घेता अनेक रहिवाशांचे नजिकच्या काळांत पुनर्वसन होण्याची शक्यता फारच कमी आहे. अशा परिस्थितीमध्ये संक्रमण शिबीरांतील रहिवाशांचा प्रतिसाद लाभेल असे वाटते. जर या योजनेस अल्प प्रतिसाद मिळाल्यास हे गाळे संक्रमण शिबीरासाठी वापरण्यांत येतील किंवा अन्य धोरण निश्चित करुन गाळे वितरीत करण्यांत येतील. सविस्तर

3' 352

[illegible] मंजूर [illegible] पुढील कार्यवाहीसाठी प्राधिकरणाकडे सादर करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

<u>ठराव क्र. १७/१३२</u>

मे. [illegible] लोअर परळ भूकर क्र. २४९ मधील ४६१६. ४८ चौ. मी. क्षेत्रफळावर विकास नियंत्रण कलम ५८ अन्वये नागरी नूतनीकरण योजना कार्यान्वित करुन उपलब्ध होणारे गाळे संक्रमण शिबीरांत अनेक वर्षे रहाणा-या व ज्यांच्या इमारती नजिकच्या काळांत पुनर्रचित होण्याची शक्यता कमी आहे, अशा रहिवाश्यांना मालकी तत्वावर वितरीत करण्यासंबंधीच्या प्रस्तावास एकमताने मंजुरी देण्यांत आली. या प्रस्तावास तांतडीने मंजुरी देऊन पुढील कार्यवाही करण्याची विनंती प्राधिकरणास करण्यात यावी.

<u>बाब क्र. १७/६</u>

विषय- रहिवासी/मालक यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करताना उर्वरीत १. १९२ चटईक्षेत्र निर्देशांकाचा लाभ मंडळास मिळण्याविषयी.

....

या विषयाची साथ टिपण्णी पृष्ठ क्र. ७३ ते ८३ वर सादर केली आहे. मुख्य अधिकारी यांनी या प्रस्तावा विषयीची सविस्तर माहिती सभागृहास सादर केली.

प्राधिकरणास पुनर्रचना योजना राबविण्यासाठी प्रचलित १. ३३ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या २. ४ पट म्हणजेच ३. १९२ चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध होतो. मात्र म्हाडा अधिनियम १०३ ब च्या तरतुदींनुसार उपकरपात्र रहिवाश्यांच्या सहकारी संस्थाना तसेच ना हरकत प्रमाणपत्राद्वारे पुनर्विकासाच्या प्रस्तांवांना २. ०० किंवा पूर्वी वापरण्यांत आलेला चटईक्षेत्र निर्देशांक यापैकी जो अधिकचा असेल अशा चटईक्षेत्र निर्देशांकाची सवलत अनुज्ञेय आहे. त्यामुळे मंडळास १. १९२ एवढया चटईक्षेत्र निर्देशांकाचा तोटा होत आहे.

मंडळास पुनर्बांधणी योजनेसाठी भूसंपादन करण्यास लांबलचक कार्यवाही करावी लागते त्याचप्रमाणे घरमालक व काही रहिवाशी यांनी न्यायालयांत केलेल्या दाव्यांमुळे अनेक योजना प्रदीर्घ काळ

.....१९

प्रलंबीत आहेत. त्यामुळे अनेक रहिवाशांना १५ वर्षांहून अधिक काळ संक्रमण शिबीरांत रहावे लागत आहे. दुरुस्ती व पुनर्बांधणी कामासाठी उपलब्ध होणारा निधी अत्यंत अपुरा आहे. हा निधी लक्षांत घेता मंडळास भविष्यकाळांत मोठ्या प्रमाणावर पुनर्बांधणी कार्यक्रम राबविणे शक्य होईल असे दिसत नाही. या परिस्थिती-मधून मार्ग काढून संक्रमण शिबीरांतील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे प्रस्ताव मंडळाच्या बैठकीपुढे विचारार्थ सादर केलेला आहे.

मंडळाने पुनर्बांधणी योजनेसाठी संपादीत केलेल्या सर्व मालमत्ता, ज्यांच्या पुनर्बांधणी योजना न्यायालयीन स्थगनादेश किंवा मालक वा रहिवाशी यांच्या विरोधामुळे लांबणीवर पडलेल्या आहेत किंवा स्थगित झालेल्या आहेत किंवा ज्या ठिकाणी भूसंपादन कार्यवाही अंतीम टप्प्यांत आली आहे. अशा सर्व मालमत्तांचा ३. १९२ चटईक्षेत्र निर्देशांक देऊन [त्यापैकी १. १९२ चटईक्षेत्र निर्देशांकान्वये उपलब्ध होणारे अतिरिक्त गाळे मंडळासाठी राखून ठेऊन] पुनर्विकास करण्यासाठी रहिवाशांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा मालमत्ताधारक यांना पुनर्विकासा-साठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यांत यावे.

सविस्तर चर्चेअंती वरीलप्रमाणे प्रस्ताव एकमताने मंजूर करुन अंतीम मंजूरीसाठी प्राधिकरणास सादर करण्याची शिफारस करण्यांत आली.

ठराव क्र. १७/१३३

बाब क्र. १७/६ अन्वये मंडळापुढे सादर केलेली टिपण्णी लक्षांत घेऊन पुढीलप्रमाणे प्रस्ताव मंजूर करण्याविषयी प्राधिकरणास विनंती करण्यात येत आहे.

मंडळाने पुनर्बांधणी योजनेसाठी संपादित केलेल्या सर्व मालमत्ता, ज्यांची कार्यवाही न्यायालयीन स्थगनादेश, किंवा मालक वा रहिवासी यांच्या विरोधामुळे लांबणीवर पडलेली आहे वा स्थगित केलेली आहे. किंवा ज्या ठिकाणी भू-संपादन कार्यवाही अंतीम टप्प्यांमध्ये आहे अशा सर्व मालमत्तांचा ३. १९२ चटईक्षेत्र निर्देशांक देऊन [त्यापैकी १. १९२ चटईक्षेत्र निर्देशांकान्वये उपलब्ध होणारे अतिरिक्त गाळे मंडळासाठी राखून ठेवून] पुनर्विकास करण्यासाठी रहिवाशांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था वा

....८

मालमत्ताधारक यांना पुनर्विकासाठी नेहमीच्या अटी व शर्तीवर ९१
ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यांत यावे.

ठराव एकमताने मंजूर.

बाब क्र. १७/७

विषय- संरचनात्मक दुरूस्तीसाठी निधीची आवश्यकता.

....

वरील प्रस्ताव पृष्ठ क्र. ८५ वर सादर केलेला आहे. मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्तावाविषयी सविस्तर माहिती सभागृहास सादर केली. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यांत आला.

ठराव क्र. १७/१३८

बाब टिपण्णीत सादर केलेल्या प्रस्तावाचा सांगोपांग विचार केल्यानंतर एकमताने निर्णय घेण्यांत आला की सन १९९३-९४ च्या अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीतून पुनर्बांधणी योजना व संक्रमण शिबीरांचे बांधकाम यासाठी केलेल्या तरतूदींपैकी ३१ मार्च १९९४ रोजी खर्च होऊ न शकणा-या निधीचे वितरण संरचनात्मक दुरूस्तीच्या खर्चासाठी करावे. या शिल्लक रकमेचे वितरण दक्षिण परिमंडळासाठी ६०% व उत्तर परिमंडळासाठी ४०% अशा प्रमाणांत करावे.

बाब क्र. १७/८

विषय- मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन १९९४-९५ या वर्षाचे अंदाजपत्रक.

......

या विषयाची बाब टिपण्णी पृष्ठ क्र. ८७ व ८९ वर सादर केली आहे. मुख्य लेखाधिकारी यांनी सभागृहास माहिती दिली की १९९४-९५ या वर्षाच्या मंजुर केलेल्या अंदाजपत्रकांतील दर्शविलेल्या जमेपेक्षा सुमारे ८.०० कोटी एवढी वाढ होण्याची शक्यता आहे. सदर अंदाजपत्रकांत जमा रक्कमेपेक्षा खर्च रू. २३० लक्ष अधिक होता. त्यामुळे निधीमध्ये रू. ८.०० कोटी येवढी वाढ झाल्यास खर्चापेक्षा जमा रू. ५.७० लक्ष एवढी अधिक होईल. सदर रू. ८.०० कोटी एवढा अतिरिक्त निधी उपलब्ध झाल्यास त्याचे वितरण पुढीलप्रमाणे करण्याविषयाचा प्रस्ताव आहे.

१] पुनर्बांधणी योजनांचे बांधकाम	रु. २२० लक्ष
२] संक्रमण शिबीरांचे बांधकाम	रु. ५० लक्ष
३] संरचनात्मक दुरूस्ती	रु. २०० लक्ष
४] नियमित व विशेष दुरूस्ती	रु. १०० लक्ष
एकूण	रु. ५७० लक्ष

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव मंजूर करण्यांत आला.

ठराव क्र. १७/१३५

बाब टिपण्णीत सादर केलेल्या प्रस्तावाचा सांगोपांग विचार केल्यानंतर एकमताने निर्णय घेण्यांत आला की १९९४-९५ च्या अंदाजपत्रकांत दर्शविलेल्या जमेत रु ८.०० कोटी एवढी वाढ झाल्यास त्याचे वितरण पुढीलप्रमाणे करण्यांत यावे:-

१] पुनर्बांधणी योजनांचे बांधकाम	रु. २२० लक्ष
२] संक्रमण शिबीरांचे बांधकाम	रु. ५० लक्ष
३] संरचनात्मक दुरूस्तीचा खर्च	रु. २०० लक्ष
४] नियमीत व विशेष दुरूस्ती	रु. १०० लक्ष
एकूण	रु. ५७० लक्ष

बाब क्र. १७/१०

विषय- पुनर्रचित गाळ्यांमधील अनधिकृत रहिवाशांना नियमीत करण्याबाबत म्हाडा अधिनियम १९८१ मध्ये दुरूस्ती करण्याविषयी.

....

वरीलप्रमाणे प्रस्ताव पृष्ठ क्र. ९१ वर सादर केलेला आहे. सहमुख्य अधिकारी यांनी या प्रस्तावासंबंधी सविस्तर माहिती सादर केली .

मंडळाच्या पुनर्रचित इमारतीमधील काही गाळे मूळ रहिवाश्यांनी अन्य रहिवाशांना दिलेले आहे. अशा अनधिकृत रहिवाशांना दंडात्मक रक्कम घेऊन अधिकृत करण्याविषयीचा निर्णय प्राधिकरणाने ठराव क्र. ४०७४ दि. २/६/९३ अन्वये घेतलेला आहे. सदर योजनेची मुदत ३१ डिसेंबर १९९३ पर्यंत होती. या योजनेस मिळत असलेला प्रतिसाद लक्षांत घेऊन तसेच मंडळाच्या योजना कार्यान्वित करण्यासाठी

उपलब्ध होत असलेला अतिरिक्त निधी लक्षात घेता या योजनेची मुदत दि. ३१ जुलै १९९४ पर्यंत वाढवावी असा प्रस्ताव आहे. अनधिकृत व्यक्तींना अधिकृत करण्यासाठी दंडाची रक्कम पुढीलप्रमाणे असावी असा प्रस्ताव आहे.

निवासी गाळे	दंडाची रक्कम
१८० चौ. फूट पेक्षा कमी क्षेत्रफळ	रु. १५,७५०/-
१८० ते ३०० चौ. फूट	रु. २१,०००/-
३०० पेक्षा अधिक क्षेत्रफळाचे गाळे	रु. २६,२५०/-

अनिवासी गाळे	
१00 चौ. फूट क्षेत्रफळापर्यंत	रु. १५,०००/-
१०० ते १८० चौ. फूट क्षेत्रफळापर्यंत	रु. ३०,०००/-
१८० ते ३०० चौ. फूट	रु. ४०,०००/-
३०० ते ५०० चौ. फूट	रु. ५०,०००/-
५०० चौ. फूटापेक्षा अधिक	रु. १,००,०००/-

याविषयावर सविस्तर चर्चा झाली. कार्यकारी अभियंता, मुंबई महानगरपालिका यांनी माहिती दिली की विकास योजना नियंत्रण नियमानुसार पुनर्रचित इमारतीमधील अनिवासी क्षेत्रफळ वाढविण्यास परवानगी नसल्यामुळे निवासी गाळयांचे अनिवासी गाळयामध्ये रूपांतर करणे नियमांच्या विरूध्द होईल. सविस्तर चर्चेअंती प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यांत आला. सदर प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी सादर करावा असा निर्णय घेण्यांत आला.

मंडळाची पुढील बैठक मंगळवार दि. २६ एप्रिल १९९४ रोजी आयोजित करण्याचे एकमताने ठरले.

मा. सभापती, उपसभापती, सदस्य व सर्व उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यांत आले.

[अतुल हुले]
सचिव.

सही/-
मुख्य अधिकारी

सही/-
सभापती